"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। निस्पृहस्य तृणं जगत् ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ४ वर्ष : ४४ जानेवारी–मार्च २०२३

**BOOK PACKET**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## तिळगूळ समारंभ - भगिनींस निमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा तिळगूळ समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती.

**माहीम**

दिनांक : रविवार १५ जानेवारी २०२३
कार्यस्थळ : माटुंगा मित्रमंडळ, एफ ४, कर्नाटक बिल्डींग, मोगल लेन, माहीम.
वेळ : संध्याकाळी ५ ते ७

**संघ कार्यकारिणीतर्फे**
सुजाता वि. केणी, मनीषा वि. आरस, नीलिमा श. नाडकर्णी

**ठाणे**

**दिनांक : रविवार १५ जानेवारी २०२३**
**संध्याकाळी : ४.०० ते ७.००**
सौ.सुरेखा सु. पालेकर यांच्या निवासस्थानी ७,दीपदर्शन, सहयोग मंदिर रोड, नौपाडा, ठाणे ९०८२६६२०१९

**सांस्कृतिक मंचतर्फे**
ज्योती कि. सुखटणकर, सुरेखा सु. पालेकर अश्विनी आ. वाघ

## ठाणे मंच – ज्येष्ठांनी निवडलेल्या गाण्यांचा सुश्राव्य कार्यक्रम

**वेळ व दिनांक :** सकाळी ९.४५ ते १.३० रविवार २६ फेब्रुवारी २०२३
**स्थळ :** तेंडुलकर सभागृह, मोगल लेन, माहीम
**सन्माननीय पाहुण्या :** सर्जनशील मराठी लेखिका श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर, पूर्वाश्रमीच्या मीरा तेलंग

**कार्यक्रम**

- ✲ नाव नोंदणी, अल्पोपाहार ✲ गणेश वंदना, सरस्वती स्तवन
- ✲ प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार
- ✲ गाणी सुचविलेल्या ज्येष्ठांचा व कलाकारांचा सत्कार ✲ गाण्यांचा कार्यक्रम
- ✲ स. पाहुण्यांसोबत विनोदी दिलखुलास हितगुज

**प्रीतीभोजन**

- ✲ गाणे सुचविणाऱ्या व्यक्तींना हजर राहण्याची विनंती
- ✲ कार्यक्रमासाठी ठाणे–मुलुंडमार्गे एक व जोगेश्वरी–अंधेरी, पारलेमार्गे एक, बसेस सकाळी ८.०० वाजता सुटतील. इच्छुकांनी आपली नावे व संपर्क नंबर कळवावे.

**संपर्क**

| सुरेश पालेकर | राजेश दिवेकर | गिरीश रेगे |
|---|---|---|
| ८९२८८५०१९३ | ९६१९३६२४६० | ९९२२९६८७२५ |

## संपादकीय

**सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील अध्यात्मिक शांतीचे केंद्र**
**सद्भक्ती मंदिराचे जन्मशताब्दी वर्ष**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील गणेशोत्सवाच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष माहिती दिली होती, त्याच सरस्वती बागेतील अध्यात्मिक शांतीचे केंद्र असलेल्या 'सद्भक्ती मंदिर' यानीही ५ ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर १०० व्या वर्षात पदार्पण केले. प.पू. भाई अर्थात् श्री. रामचंद्र शंकर टाकी महाराज यांनी १९२२ साली विजयादशमीच्या दिवशी 'सद्भक्ती प्रसारक मंडळी' ही संस्था स्थापन केली व १९२३ साली सरस्वती बागेत स्वत:ची वास्तु उभारली. आपल्या पूज्य पित्याच्या स्मरणार्थ त्याला 'शंकर लॉज' हे नाव दिले, ते आजचे 'सद्भक्ती मंदिर' या मंदिराचे आराध्य दैवत श्री गुरुदेव दत्त आहे. या वास्तूच्या पवित्रतेचं किंवा या वास्तूला 'मंदिर' हा दर्जा लाभण्याचे कारण म्हणजे श्री दत्तगुरु परंपरेपैकी एक निस्सीम भक्त श्री नारायण महाराज गालवणकर यांना लाभलेले आत्मलिंग, पादुका व श्री दत्तगुरूंची पंचधातूची अप्रतिम सुंदर मूर्ती इथे स्थानापन्न झाली आहेत. त्यामुळे आजुबाजूचा परिसर चैतन्यमय झाला आहे. महाराष्ट्र भूषण पु. ल. देशपांडे बालपणी, सरस्वती बागेत रहात होते. त्यांच्या मातोश्री कमलताई श्री भाईंच्या प्रवचनांचा नियमित लाभ घेत. पुलंनाही श्री. भाईंबद्दल नितांत आदर होता. पुलंचे पहिले जाहीर भाषण वयाच्या सहाव्या वर्षी टाकी महाराजांच्या पुढे सद्भक्ती मंदिरात झाले याची आठवण त्यांनीच एका लेखात नमूद केली आहे.

विजयादशमी ५ ऑक्टोबर २०२२ पासून २०२३ च्या विजयादशमीपर्यंत शताब्दीच्या वर्षात मंदिरात विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्याचा विश्वस्तांचा मानस आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत गायन, वादन, नृत्य इत्यादी सादर करण्याकरिता नामवंत कलाकारांना पाचारण करण्यात येत आहे. सामाजिक उपक्रमाद्वारे श्रीमद्भगवद्गीता, श्री रामरक्षा, श्री हनुमान चालीसा आधारित विद्यार्थ्यांकडून पाठांतर स्पर्धा आयोजित केली आहे. धार्मिक कार्यक्रमांत नामवंत गुरुजींकडून कीर्तन, प्रवचन सादर करण्यात येतील.

मंदिराची वास्तु १०० वर्षांची जुनी असल्याने शताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्याची डागडुजी करणे आवश्यक आहे. त्याचा अंदाजे खर्च रु. २५ लाख एवढा अपेक्षित आहे. ज्या भक्तांना गुरुदेवाची सेवा म्हणून आर्थिक साहाय्य करण्याची इच्छा असेल त्यांनी एक सक्रीय व उत्साही विश्वस्त श्री. अरूण विजयकर, सरस्वती बाग, ९२२३२२२२४५ यांच्याशी संपर्क साधावा ही विनंती.

नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा.

१ जानेवारी २०२३






**आपल्या ज्ञातीबद्दल,**
**आपल्या हिंदु हायस्कूलबद्दल,**
**आपल्या कारवारबद्दल,**
**आपल्या परमपवित्र देवदेवता**
**तसेच देवालयांबद्दल,**
**तसेच लेखकाच्या अनेक**
**स्वानुभवांबद्दल**
**प्रामाणिक कथन**
**श्री. अरुण भास्कर कसबेकर**
लिखित–

# कवडसे मनाचे

**प्रत्येक कारवारकराच्या संग्रही असण्यायोग्य**

**मूल्य : केवळ रु. ३००**

**व संपूर्ण रक्कम एन.के.जी.एस.बी. संघाला जाईल**

**आपल्या वाचनानंतर लेखकाची कानउघाडणी, टीका ऐकण्यास स्वत: लेखकासह सर्व आतूर आहेत. मुखपत्रिकेत प्रसिद्धी दिली जाईल.**

**आपल्या प्रतिसाठी संपर्क**

**NKGSB SANGH**
**Phone : 23877301 / 23880073**
**E-mail : nkgsbs@gmail.com**

## प्रकाश झोत

### माशे, काणकोण येथील निराकार विद्यालयाच्या प्राथमिक शाळेचे 'रेखा रामदास फेणे विद्यामंदिर' असे नामकरण.

गोमंतकांत स्व. रामदास फेणे व स्व. रेखा फेणे यांचे शिक्षण क्षेत्रांतील भरीव योगदान सर्वश्रुत आहे. १९६५ पासून उभयतांनी माशे येथील निराकार शिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या चौफेर प्रगतीसाठी अतोनात कष्ट घेतले. त्यांचे निष्कलंक कार्य एवढे कौतुकास्पद होते की शासनाने व काही सामाजिक संस्थांनी त्यांना अनेक नामांकने व पुरस्कार त्यांच्या हयातीतच प्रदान केले गेले. या सर्वांवर कळस म्हणजे काणकोण तालुक्यातील माशे येथील निराकार विद्यालयाच्या व्यवस्थापकांनी उभयतांच्या मौलिक ऋणातून अंशत: तरी मुक्त होण्यासाठी आणि त्यांच्याबद्दल असलेल्या असीम आदरापोटी आपल्या प्राथमिक शाळेचे 'श्रीमती रेखा रामदास फेणे विद्यामंदिर' असे नामकरण केले. ९ ऑक्टोबर रोजी झालेल्या एका हृद्य समारंभात विधानसभेचे सभापती श्री. रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत हे नामकरण झाले. यावेळी फेणेंच्या अनेक चाहत्यांनी उभयतांवर स्तुतीसुमने उधळली. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसारच ही संस्था गुणात्मक व दर्जात्मक विद्याप्रसाराचे कार्य करीत आहेत असे सर्वांनी आवर्जून नमूद केले. वर्गाच्या चार भिंतींच्या पलीकडे जाऊन केवळ पुस्तकी ज्ञानालाच महत्त्व न देता कला, क्रीडा, नृत्य, पाककला यांनाही त्यांनी उत्तेजन दिले याचा त्यांनी प्रकर्षाने उल्लेख केला. या सोहळ्याला स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळाली हे विशेष.

### सोलापूरच्या सांगोला तालुक्यातील ७५ कि.मी. लांबीच्या मृतप्राय नदीचे पुनरुज्जीवन करण्याच्या योगदानाबद्दल श्री. श्रीहर्ष फेणे यांचा सत्कार

सोलापूरच्या सांगोला तालुक्यात पूर्वी ७५ कि.मी. लांबीची माणगांव ही नदी मृतप्राय अवस्थेत होती व तो परिसर कोरडा असे. तेथील एक समाजसेवक श्री. वैजीनाथ घोंगडे यांनी या कोरड्या नदीचे पुनरुज्जीवन करण्याचे व्रत घेतले. सुप्रसिद्ध लघुकथा व कादंबरीकार स्व. वसंत फेणे यांचे सुविद्य चिरंजीव श्री. श्रीहर्ष फेणे हे स. का. पाटील यांनी स्थापन केलेल्या बृहद् भारतीय समाज या संस्थेचे एक सक्रीय विश्वस्त आहेत. त्यांनी आपल्या एका समविचारी वर्गमित्राच्या साहाय्याने समाजातर्फे गेली सात वर्षे श्री. घोंगडे यांना पुनरुज्जीवनाच्या प्रकल्पात सर्वतोपरी आर्थिक, तांत्रिक व नैतिक साहाय्य केले. त्यासाठी मुंबईहून ३८० कि.मी. दूर असलेल्या वैराण अशा सांगोला तालुक्याला सुमारे २५ वेळा भेटी दिल्या. आता हा प्रकल्प पूर्ण झाला आहे व नदीच्या परिसरांत लक्षणीय हिरवळ निर्माण झाली आहे. वन्य पशुपक्ष्यांनाही आसरा मिळाला आहे. या उल्लेखनीय प्रकल्पासंबंधी श्री. घोंगडे यांनी 'परिक्रमा माणगंगेची' हे



उपयुक्त माहिती असलेले पुस्तक लिहिले. त्याचा प्रकाशन समारंभ ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात सुप्रसिद्ध जलसंवर्धक पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते झाला व त्याप्रसंगी इतर समाजसेवकांसह श्री. फेणे यांच्या निरलस व अतुलनीय योगदानाबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

### 'कवडसे मनाचे' श्री. अरुण कसबेकर यांचा लेखसंग्रह

शतेषु जायते शूर: सहस्त्रेषु च पण्डित: ।
वक्ता दशसहस्त्रेषु दाता भवति वा न वा ।

श्री. अरुण भास्कर कसबेकर हे मुखपत्रिकेच्या वाचकांना विविध प्रसंगी त्यांनी दिलेल्या भरघोस देणग्यांमुळे 'दाता' म्हणून परिचित झालेलेच आहेत. त्याशिवाय मुखपत्रिकेद्वारे विविध विचारांना चालना देणारे व अंतर्मुख करणारे त्यांचे लेखही सर्वांच्या वाचनांत आले आहेत. त्यामुळे अल्प पातळीवर का होईना ते 'पण्डित' या संज्ञेसाठी ही पात्र झाले आहेत. साधारणपणे आजचे वृत्तपत्र किंवा नियतकालिक म्हणजे उद्याची रद्दी. पण पन्नास साठ वर्षांनंतर त्यातील काही मजकूर तत्कालीन सामाजिक स्थितीच्या इतिहासाचे साधन होते. श्री. कसबेकर यांचे मुखपत्रिकेतील सर्व लेख काळाच्या उदरात गडप होण्यापूर्वी त्या लेखांचा संग्रह करून तो प्रकाशित करण्याचा त्यांचा संकल्प खरोखरच स्तुत्य आहे.

या ग्रंथाचे 'कवडसे मनाचे' हे नावसुद्धा समर्पक आहे. त्यांच्या खिलाडूवृत्तीनुसार या संग्रहासंदर्भात कौतुकाशिवाय मोकळ्या मनाने टीका करण्याचेसुद्धा त्यांनी वाचकांना आवाहन केले आहे, निंदकाचे घर असावे शेजारी या प्रथेनुसार. या संग्रहाची एक कमतरता म्हणजे त्यांतील लेख सर्वव्यापी नसून केवळ आमच्या ज्ञातिबांधवांना भावतील असे मर्यादित उपयुक्ततेचे आहेत. या संग्रहाचे मूल्य व वितरणाविषयी विशेष तपशील पृष्ठ ४ वर दिला आहे.

### श्री. अरुण कसबेकर यांच्या भरघोस देणगीमुळे समाजसेवा लाभार्थींच्या मासिक साहाय्यात एक हजार रुपयांची वाढ शक्य

संघाला वेळोवेळी ज्या देणग्या मिळतात त्याची रक्कम काही बँकांमध्ये मुदत ठेव म्हणून गुंतविल्या जातात. त्यांतून मिळणारे त्रैमासिक व्याज हे संघाचे प्रमुख उत्पन्न. या उत्पन्नातूनच संघाच्या समाजसेवा लाभार्थींना मासिक अर्थसाहाय्य देण्यात येते. काही वर्षांपूर्वी बँकेचे व्याज भरपूर होते व त्यानुसार मासिक साहाय्य देण्याचे बजेट केले जात असे. अलीकडे बँकेच्या व्याजदरांत लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे संघाला मिळणाऱ्या व्याजाचे उत्पन्न कमी झाले होते. पण नैतिक दृष्ट्या मासिक साहाय्य कमी करणे योग्य नव्हते. त्यामुळे बरीच ओढाताण होत असे. सुदैवाने अलीकडेच संघाचे एक निस्सीम दानशूर हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर यांनी एक कोटी एक लाख रुपयांची प्रचंड देणगी दिली. त्यातील एज्युकेशन सोसायटीस दिलेले

रु.२५ लाख वजा करता संघाला उर्वरित रु. ७६ लाख मिळाले. त्यामुळे बँकेच्या कमी व्याजदरामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाची चिंता मिटली. एवढेच नव्हे तर प्रत्येक लाभार्थीला एप्रिल २०२२ पासून मासिक आर्थिक साहाय्यात घसघशीत वाढ करणे शक्य झाले आहे. त्यामुळे सध्या ४२ वृद्धांना मासिक रु. १००० व १५ अतिवृद्धांना मासिक रु. १३०० एवढी भक्कम वाढीव साहाय्य देणे शक्य झाले आहे. या सर्व ५७ वृद्धांचे आशीर्वाद श्री. कसबेकर यांच्या पाठीशी असणारच याची खात्री आहे.

**लेबल निर्मिती व्यवसायात शून्यातून विश्व निर्माण करणारे श्री. जगन्नाथ वागळे यांच्या दुबईतील कंपनीला पुरस्कार**

बाड येथे वागळेवाड्यावर 'व्हडले घर' हे एक प्रशस्त निवास होते व तेथे श्री. जगन्नाथ वागळे यांचे वास्तव्य असे. त्यांच्याच नावाचा त्यांचा नातू श्री. जगन्नाथ मंगेश वागळे याचे बालपण नलासोपारा या खेडेगावात गेले. वडिलांचे उत्पन्न यथातथाच होते. अशा कठीण परिस्थितीतसुद्धा त्यांच्या आईनी केवळ माणुसकीच्या नात्याने आपल्या गावच्या एका गरीब मुलाचा सांभाळ करण्यासाठी त्याला आपल्या घरी ठेवून घेतले. केवळ ३०० स्क्वेअरफुटांच्या मध्ये जगन्नाथ, दोन भाऊ, आईवडील व गावचा मुलगा असे सहाजण दाटीदाटीने पण सुखासमाधानाने रहात होते. या परिस्थितीतसुद्धा जगन्नाथ हे बी.एस्सी. टेक ही परीक्षा उत्तीर्ण झाले. मुंबईत काही दिवस नोकरी केल्यावर त्यांचे मामा दुबईत लेबलचा छोटासा व्यवसाय करीत होते. त्यांचे सेल्समन म्हणून २००४ साली ते तेथे गेले. लेबल व्यवसायाचे कुठलेही ज्ञान नसताना स्वत:च्या कर्तबगारीने, जिद्दीने, कठोर परिश्रमाने व चिकाटीने त्यांनी या व्यवसायात जम बसविला. स्वत:ची लेबल करण्याची कंपनी २०१० साली सुरू केली. सुरुवातीला केवळ ११०० स्क्वेअर फूट जागेत प्रिंटींगचे एक जुने मॉडेल विकत घेतले व एक तंत्रज्ञ व एक मदतनीस यांच्यासमवेत कामाला सुरुवात केली. प्रथम प्रथम त्यांनी हमालीसुद्धा केली. दिवसेंदिवस त्यांनी आपला व्यवसाय वृद्धींगत केला. सध्या त्यांच्याजवळ १२००० स्क्वेअर फूटची विस्तीर्ण जागा आहे. अद्ययावत यंत्रसामग्री आहे व ५५ कुशल तंत्रज्ञ आहेत. त्यांची वार्षिक उलाढाल ७५ कोटींच्या घरात आहे, एवढी प्रचंड उलाढाल श्री. वागळे यांच्या केवळ ४५ व्या वर्षी! दुबई हे लेबल व्यवसायामध्ये जागतिक केंद्र आहे व तेथून मध्य आशिया, आफ्रिका, युरोप व अमेरिका येथे माल पुरविला जातो. या व्यवसायात तेथे ४० कंपन्या आहेत व त्यांची एक केंद्रीय संस्था आहे. श्री. वागळे यांच्या कंपनीचे नाव आहे 'सिग्मा मिडल ईस्ट लेबल्स'. श्री. वागळे यांच्या कर्तबगार व सुविद्य पत्नी सौ. पूजा या कंपनीच्या भागीदार आहेत व त्या कंपनीचे व्यवस्थापन समर्थपणे सांभाळतात. अलीकडेच दुबईमध्ये 'Best Printing Company of the Year 2022' हा पुरस्कार त्यांना मिळाला. दुबईसारख्या परदेशात जाऊन कठीण परिस्थितीत लेबल निर्मितीच्या व्यवसायात शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या 'आमगेल्या' जगन्नाथाचे हार्दिक अभिनंदन.



**सिॲटल येथील श्री. शिरीश नाडकर्णी यांच्या पुस्तकाला तीन पुरस्कार**

भारतातल्या सर्वात मोठ्या स्टेट बँकेचे निवृत्त चेअरमन स्व. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांचे ६२ वर्षांचे कनिष्ठ चिरंजीव विद्यार्थी दशेपासून अमेरिकेत स्थायिक आहेत. अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या हार्वर्ड बिझीनेस स्कूलमधून ते एम.बी.अे. परीक्षा उत्तीर्ण झाले. सध्या उद्योगक्षेत्रात स्टार्टअप हा परवलीचा शब्दप्रयोग झाला आहे. या नूतन क्षेत्रात श्री. नाडकर्णी यांचा गेल्या वीस वर्षाचा दांडगा अनुभव आहे. ते LIVE MOCHA या उद्यमाचे सहसंस्थापक होते. विविध भाषा अवगत करून घेण्याच्या क्षेत्रांत ती सर्वांत मोठी साईट होती व त्याचे दीड कोटींहून अधिक ग्राहक होते. ही कंपनी प्रचंड नफ्यात विकल्यानंतर त्यांनी २०२१ पासून ZOOMINGO ही नवीन कंपनी एका सहकाऱ्यासमवेत स्थापन केली. ही कंपनी संगणकीय आदानप्रदान क्षेत्रात अग्रणी आहे.

स्टार्टअप क्षेत्रांतील आपल्या विविधांगी अनुभवावरून त्यांनी 'FROM START UP TO EXIT - An insider's guide to launching and scaling your tech business' हे एक अभ्यासू पुस्तक लिहिले. या क्षेत्रात या पुस्तकाची संदर्भ ग्रंथ अशी गणना केली जाते. त्याच्या उपयुक्ततेमुळे या पुस्तकाला तीन प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. 2021 Winner NYC Big Book Award in Industrial Business category, Royal Dragonfly Book Award असे दोन पुरस्कार पूर्वी मिळाले होते. अलीकडेच त्यांना तिसरा म्हणजे Gold Medal award from Global Book Award in Entrepreneurship Category हा पुरस्कार मिळाला.

श्री. नाडकर्णी यांना मिळालेल्या पुरस्कारांबद्दल त्यांचे अभिनंदन.

**भारतीय स्वच्छता अभियान सर्वेक्षणात कारवार शहराला प्रथम क्रमांक व रेल्वे स्थानकाला सर्वोत्कृष्ट नैसर्गिक सौंदर्याबद्दल कारवार स्थानकाला द्वितीय क्रमांक**

स्वच्छ भारत मिशनच्या अंतर्गत भारतभर १८५० हून अधिक शहरांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यांत पन्नास ते एक लाख लोकसंख्या असणाऱ्या शहरांच्या गटात दक्षिणेतील काश्मीर अशा आमच्या कारवार शहराला प्रथम क्रमांक मिळाला. ३० सप्टेंबर रोजी दिल्ली येथे झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात कारवार नगरपालिकेचे अध्यक्ष डॉ. नितीन श्रीपाद पिकळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

तसेच, दुसऱ्या एका सर्वात निसर्गरम्य रेल्वे स्थानकाच्या क्रमवारीत केरळ येथील चेरुकरा रेल्वे स्थानकाला प्रथम क्रमांक मिळाला व द्वितीय क्रमांक कारवार रेल्वे स्थानकाला मिळाला.

# Outstanding Alround Achievements Of Gand kids Of **Shri Shashikant Netravali**

Grandkids of Shashikant G. Netravali of Vile Parle have excelled in many activities, educational as well as sports.

His 15 years old grandson Ansh living in Mumbai is a 10th standard student of Lourel Spring school, Ojai, California. He is a three times National Level Gold medalist in Skating. He also got 3 Gold Medals in the USA New York state skating.

He has tremendous interest in Mathematics and Science. He participated in various competitive examinations conducted by different countries viz. Singapore, Canada, Malaysia and South Korea. In 2019 World Mathematics Championship besides getting a silver medal for him, his school team got a gold medal in Mathematics. He got a gold medal in Mathematics in following competitive examinations namely SASMO, Gauss, Pascal, Kayley. He is a proud owner of a Gold Medal in the VANDA examination for Science. He stood 107th rank in the world and 7th in India in Isaac Newtons examination for Physics. Besides these achievements, he is very good in playing piano and guitar.

His 13 year old granddaughter Aria, is following her brother's footsteps. She is 8th standard student of Aditya Birla World Academy, Tardeo. She too is a proud owner of 2 Gold Medals in National Level skating.

She too has equal interest in Mathematics and Science. She too participated in various competitive examinations conducted by different countries viz. Singapore, Canada etc. She got one silver and one Bronze medal in Mathematics and a silver medal in Vanda examination.

She too plays Piano and Violin

Last summer both were chosen for different mathematical programs held in the USA. Ansh was chosen for Mathlier program an intensitve residential summer program held in Pennsylvania, USA and Aria was chosen for advance Mathematics program Cybermath held at Harvard, USA.

Shri. Netravali's daughter, Shalaka has 2 MS degrees in Pharma Admin and in Public Health from Johns Hopkins University, USA.

Heartiest congratulation to both Ansh and Aria.



# ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन

सर्वांना माहीत आहेच की, दरवर्षी भरणारे आपल्या ज्ञातीचे स्नेहसंमेलन गेली दोन वर्षे २०२० व २०२१ मध्ये कोविड साथीमुळे होऊ शकले नाही. या वर्षी २० नोव्हेंबर २०२२ रोजी प्रा. बी. एन. वैद्य सभागृह, दादर येथे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

आजच्या प्रमुख पाहुण्या विदुषी आणि लेखिका, श्रीमती नीलिमा शशिकांत नाडकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर कार्यक्रमास सुरुवात झाली.

गेल्या ३ वर्षात दिवंगत झालेल्या ज्ञातिबांधवांना श्रद्धांजली वाहण्यात झाली. नंतर संघ, सोसायटी, ठाणे मंच आणि मुंबई मंच कार्यकारिणीच्या सभासदांची ओळख करून देण्यात आली.

संघाचे अध्यक्ष श्री. मारुति दळवी यांनी गेल्या वर्षाच्या कामांचा आढावा घेतला, तसेच ज्ञातीतील दानशूर व्यक्तींची नावे सांगून त्यांचे आभार मानले. सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी सोसायटीच्या कामाचे महत्त्व सांगितलेच शिवाय पर्यावरणाविषयीही छान मत मांडले.

श्री. देवदास नाडकर्णी यांनी प्रमुख पाहुण्या नीलिमा नाडकर्णी यांची सविस्तर ओळख करून दिली. श्री. मारुति दळवी यांनी संघाचे मानचिन्ह व संघ सोसायटीतर्फे पुष्पगुच्छ देऊन श्रीमती नाडकर्णी यांना सन्मानित केले.

अनेक मासिकांत लेख लिहिणाऱ्या, आकाशवाणीवर अनेक कार्यक्रम सादर करणाऱ्या, पुस्तकाला मानाचा पुरस्कार मिळवणाऱ्या नीलिमाताईंनी प्रेक्षकांसोबत गुजगोष्टी केल्या. संघ, संस्कार आणि संस्कृती यावरचे खूप छान विश्लेषण त्यांनी केलेच शिवाय लोकमान्य टिळक, सी.डी. देशमुख, चिं.वि. जोशी, ज्योत्स्ना भोळे यांचे किस्से सांगून प्रेक्षकांची वाहवा मिळवली आणि हे सर्व त्यांनी हातात कागद न घेता, सलगपणे अस्खलीतपणे कोंकणी भाषेत सांगितले. खरंच कौतुकास्पद!

आपल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय नैपुण्यांबद्दल गेल्या ३ वर्षांतील अकरा मुलांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी डॉ. अमेया मुझुमदार आणि आर्या वर्टी यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काही कारणास्तव इतर मानकऱ्यांना हजर राहता आले नाही.

**२०२०**

| | |
|---|---|
| १) तेजश्री दत्तकुमार कुलकर्णी | LLB Gold Medalist |
| २) डॉ. मंदार दत्तात्रय मुझुमदार | M.D. Ayurdveda First |
| ३) डॉ. अनुजा नागेश बोरकर | Post Graduate Diploma in Obstatric and Gynacology |

**२०२१**

| | |
|---|---|
| १) भाग्येश संजय तेलंग | M.Sc. |
| २) मानसी हरीश पालेकर | M.Sc. |

| | |
|---|---|
| ३) पंकजा नागेश पिंगे | C.A. |
| ४) तन्वी महेश संजगिरी | Best fashion photography award |

२०२२

| | |
|---|---|
| १) डॉ. अमेया साईप्रसाद मुझुमदार | M.S. (Gen) |
| २) निकीता संतोष दिवेकर | PhD. |
| ३) आर्या रवींद्र वर्टी | Interclub Table Tennis Team League Bronz Medal<br>ध्रुवा संस्कृत महोत्सव नाट्यस्पर्धा प्रथम क्रमांक<br>Nelta Ecat English Language competition 2nd Rank |
| ४) श्रद्धा प्रसाद सोहोनी | Kathak Alankar (Post Graduate) |

मध्यंतरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच वयाची ७५ वर्षे ओलांडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्यानंतर एज्युकेशन सोसायटीतर्फे अनेक स्पर्धांतील विजेत्यांना तसेच विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केल्याबद्दल श्रीमती मंजिरी कुलकर्णी आणि कु. समीक्षा पालेकर या दोघींना पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

– **मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| **अशाली शिवानंद दिवेकर, अमेरिका** | **व** | **अमर अरोरा, अमेरिका** |
| **प्राची प्रताप कसबेकर, वाळकेश्वर** | **व** | **अभिषेक प्रकाश गोर, ऑस्ट्रेलिया** |
| **सिद्धेश प्रणव मुझुमदार, जोगेश्वरी** | **व** | **विधी हरेश शनिश्चर, मुंबई** |
| **शारंग चंद्रशेखर (शेखर) नाडकर्णी अमेरिका** | **व** | **निकीता संतोश दिवेकर, अमेरिका** |
| **सोनिया रणजीत फेणे, अमेरिका** | **व** | **Zach Reinzner अमेरिका** |
| **श्रेयस राजीव पिकळे, अंकोला** | **व** | **स्मिथा शंकरप्पा वीरण्णा, हरीहर** |
| **जय प्रशान्त पिकळे, अंधेरी** | **व** | **मोहिनी राजेंद्रकुमार निर्मल, मुंबई** |



# विवाहाचा सुवर्ण महोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

२०२०

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती मीरा | व | श्री. ज्ञानेश्वर विनायक आरस | बडोदा |
| श्रीमती सुनंदा | व | श्री. मोहन शांताराम भेडसगावकर | बोरिवली |
| श्रीमती स्मिता | व | श्री. किशोर रामचंद्र भेंडे | जोगेश्वरी |
| श्रीमती अंजली | व | श्री. अशोक व्यंकटराव दिवेकर | पारले |
| श्रीमती जयंती | व | श्री. दयानंद श्रीनिवास गायतोंडे | बोरिवली |
| श्रीमती राजश्री | व | श्री. रमेश गणपत कुलकर्णी | पारले |
| श्रीमती नीला | व | श्री. दिलीप माधव मुझुमदार | दादर |
| श्रीमती सीमा(मेधा) | व | डॉ. सुहास गोविंद फेणे | बंगळूर |
| श्रीमती शोभा | व | श्री. अरुण रामकृष्ण समाणी | प्रभादेवी |
| श्रीमती पुष्पा | व | श्री. शिवानंद शंकर तेलंग | दादर |
| श्रीमती सुप्रिया | व | श्री. मोहन भवानीशंकर तेलंग | वाशी |
| डॉ. माया | व | डॉ. सुहास पांडुरंग वाघ | माहीम |

२०२१

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती अपर्णा | व | श्री. प्रकाश विठ्ठल बोरकर | अंधेरी |
| श्रीमती मृणालिनी | व | डॉ. रमेश सदाशिव सलगर | जोगेश्वरी |

२०२२

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती मिथीला | व | श्री. मनोहर नीलकंठ आमोणकर | विरार |
| श्रीमती आसावरी | व | डॉ. विवेक मधुसूदन भट | पारले |
| श्रीमती अनसूया | व | श्री. अनिल भीमराव मजली | वडाळा |
| श्रीमती प्रतिमा | व | श्री. प्रमोद गणपती मुझुमदार | पारले |

# ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आलेल्यांची नावे

**२०२०**

| | |
|---|---|
| मिथीला मनोहर आमोणकर, विरार | मीरा ज्ञानेश्वर आरस, बडोदा |
| प्रीता शरद बोरकर, कारवार | शरद मारुति बोरकर, कारवार |
| स्मिता किशोर भेंडे, जोगेश्वरी | वैशाली नंदकुमार दडकर, वरळी |
| वृंदा अरविंद दिवेकर, मुलुंड | अनुपमा व्यंकटराव कामथ, गोरेगांव |
| दीपा दिलीप मुझमदार, ठाणे | सुलभा दत्तात्रय मुझुमदार, दादर |
| प्रमोद गणपती मुझुमदार, पारले | शैलजा मंगेश नाडकर्णी, दादर |
| उमाकांत काशिनाथ पालेकर, जोगेश्वरी | रेखा शरद सलगर, ठाणे |
| सुधीर शंकर तेलंग, अंधेरी | शिवानंद शंकर तेलंग, दादर |
| आशा कृष्णा तेलंग, ग्रांटरोड | शैलजा शांताराम वागळे, पारले |

अजित महाबळेश्वर वर्टी, वरळी

**२०२१**

| | |
|---|---|
| मृदुला गोविंद भांडारकर, गिरगांव | अपर्णा प्रदीप बोरकर, वाकोला |
| मधुसूदन दत्तात्रय कसबेकर, बोरीवली | सीमा प्रमोद किन्नरकर, गोवा |
| मृदुला मंगेश कुलकर्णी, बदलापूर | शशिकांत गणपत नेत्रावळी, पारले |
| किरण श्रीपाद वाघ, खारघर | शीला विठ्ठल वाघ, गिरगांव |
| प्रकाश महारुद्र वाघ, मुलुंड | सुवर्णा पंढरीनाथ वागळे, गोरेगांव |

**२०२२**

| | |
|---|---|
| अरुण सदानंद बोरकर, दादर | सुनेत्रा अरविंद बोरकर, वांद्रे |
| सुषमा अरुण गायतोंडे, पुणे | विद्या दुर्गादास कसबेकर, गोरेगांव |
| मृदुला सतीश कसबेकर, पुणे | अनिल काशिनाथ नाडकर्णी, गोरेगांव |
| विजयानंद महेश्वर नाडकणी, मंगेशी | सुभाष बाळकृष्ण पालेकर, पारले |
| मंगेश भालचंद्र पालेकर, ग्रांटरोड | विजया लक्ष्मी रामचंद्र राव, कांदिवली |
| शोभा अरुण रामाणी, प्रभादेवी | विजयकुमार नरहर तेलंग, माटुंगा |
| सुशान्ता शिवानंद तेलंग, दादर | सुप्रिया मोहन तेलंग, वाशी |
| सदाशिव जिवाजी वागळे, पारले | हेमलता गुरुनाथ वर्टी, मुलुंड |



# *अभिनेता विक्रम गोखले - विनयाचा महामेरू*

छाती फुगवून मी विमानाची शिडी चढत होतो. हा माझा कंपनी तर्फे पहिला वहिला विमानप्रवास होता. १९७८–७९ चा काळ. महिंद्रा ग्रुपमधल्या व्हिकर्स स्पेरी या कंपनीत काम करत असताना मला बडोद्याला कामासाठी जावं लागलं. त्या वेळी कंपनी साठी सर्व प्रवास रेल्वेच्या पहिल्या वर्गाने व्हायचा. परंतु काम अर्जंट असल्याने मला विमानप्रवासाची संधी मिळाली. जेमतेम चव्वेचाळीस सीट असलेलं, पुढे दोन भीतीदायक पंखे असलेलं त्यावेळचं ॲवरो विमान. कडक इस्त्रीचे कपडे घालून, हातात स्टायलिश व्हीआयपी ब्रीफकेस घेऊन मी अभिमानाने आंत चढलो. बसलेल्या प्रवाश्यांवर नजर फिरवली. विचार करु लागलो, यातील किती लक्षाधीश कोट्याधीश असतील ?

या विमानात पॅसेजच्या प्रत्येक बाजूला फक्त दोन दोनच सीट होत्या. माझ्या सीटवर बसताना, खिडकीपाशी बसलेल्या त्या उमद्या देखण्या पुरुषाने हसत नमस्कार करीत स्वागत केलं. मी पण हसत म्हटलं,

'गुड मॉर्निंग'

'नमस्कार. आपण मराठी बोलता का ?' शेजारील व्यक्ती मैत्रीपूर्ण आवाजात उद्गारली.

मी ओशाळून स्वतःला सावरत म्हणालो,

'हो. हो. पण गुड मॉर्निंग म्हणायची सवय आपली.'

'असू द्या हो. आपलं नाव ?' तो म्हणाला.

'मी विजय कामत. महिंद्रा ग्रुपमध्ये काम करतो.' मी अभिमानाने म्हणालो.

'अरे व्वा. छान. असं बघा. माझ्या पणजीचं आडनाव पण कामत. मी गोखले.' दिलदारपणे हसत तो म्हणाला.

'असं का ? छान. तुम्ही कुठे काम करता हो ?' माझी पृच्छा.

'तसा मी कुठेच नोकरी करत नाही. तुम्ही मराठी नाटकं पहातां का ?'

मी सांगितलं की गेल्या १२ वर्षे आवड असूनही मराठी नाट्यसृष्टीशी संबंध ठेवता आला नव्हता. करुणेने मान हलवत त्याने विचारलं,

'मग आजकालचे हिंदी चित्रपट ? उदाहरणार्थ 'यही है जिंदगी' ?'

मला आठवलं, हल्लीच हा चित्रपट मी बघितला होता. पण त्याला पाहिल्याचं आठवेना. मी चांचरत विचारलं,

'हो पण तुम्ही दिसला नाही त्यात. कुठला रोल केला होता ?'

'श्रीकृष्णाचा !' गोखले सहज छद्मीपणे हसत उद्गारले. अगदी त्या पिक्चर मधील श्रीकृष्णासारखे.

मी अवाक होऊन शरमेने खाली बघू लागलो. नंतर हा किस्सा मित्रांबरोबर शेअर करताना सर्वांनी हेवा करत म्हटलं,

'तुला कल्पना नाही, तू किती लकी आहेस. विक्रम गोखले या नाट्यसृष्टीमधील असामान्य व्यक्तीच्या शेजारी तू बसला होतास !'

– **विजय कामत**, ठाणे – ९८३३६६९७८८

# ठाणे मंच आयोजित चेट्टीनाडची अविस्मरणीय सहल

मागे २०१९ साली कूर्ग शिरसीची सहल करून आल्यावर आम्हा सर्वांनाच पुढच्या सहलीचे वेध लागले होते. तेव्हा ठाणे मंच व अनुभव ट्रॅव्हल्स यांनी एकत्र येऊन सप्टेंबर २०२२ मध्ये चार दिवसाची छोटीशी चेट्टीनाड सहल आयोजित करत असल्याचे समजल्यावर खूप आनंद झाला. तब्बल तीन वर्षांनी एकूण १५ ज्ञातिबांधव, त्यातले थोडे कूर्गच्या सहलीतले व इतर नवीन बांधव १८ सप्टेंबरला सकाळी मुंबई विमानतळावर भेटले. सर्वजण उत्साही, आनंदी व मायेस्त असल्याने मैत्रीचे बंध  निर्माण होण्यात फारसा वेळ लागला नाही. नंतर विमानाने दुपारी मदुराईला पाहोचलो. तेथे अनुभवचा हसरा, नम्र चेतन जातीने हजर होता. वातानुकूलित एक कार व एक मिनीबसमधून आमचा २० कि.मी. अंतरावर असलेला मदुराई सिटीचा प्रवास सुरू झाला. सिटीमध्ये साधेच पण चविष्ट शाकाहारी जेवण घेऊन चार वाजता मीनाक्षी मंदिराकडे प्रस्थान केले. प्रचंड गर्मी व अतिशय थोडा वेळ यामुळे व्हीआयपी टिकीट घेऊन देवदर्शन केले. बरोबर सात वाजता आमचा पुढचा ९० कि.मी.चा चेट्टीनाडमधील कारयकुडी ह्या गावचा प्रवास सुरू झाला. सबंध दिवसाच्या प्रवासाने सर्वांना शीण आला होता. पण जेव्हा आम्ही 'बांगला' या हेरीटेज वास्तूत प्रवेश केला व आमच्या खोलीत गेलो. सुग्रास जेवणाचा आस्वाद घेतला तेव्हा शीण व थकवा कोठच्या कोठे पळून गेला.

दुसऱ्या दिवशी स्थल दर्शनासाठी आमच्या बरोबर 'अन्नपूर्णा' नावाची महिला गाईड म्हणून होती. तिचे इंग्रजीवरील प्रभुत्व व साध्या सरळ सोप्या भाषेत सांगण्याची शैली यामुळे खूपच छान माहिती मिळाली. ह्या दोन दिवसात आम्ही एकूण चार मंदिरे पाहिली. शिव मंदिर, विष्णु मंदिर, अयन्नार व कोळीलूर मंदिर फार प्रेक्षणीय आहेत. तिरुमयम येतील पालव राजवटीतील सातव्या शतकातील एका. किल्ल्यात एकाच कातळात बांधलेले हे शिवमंदिर आहे. येथील शिवलिंग पाहण्यासाठी सुद्धा तीस पायऱ्या चढून जावे लागते. शत्रूने वेढा घातल्यावेळी देवदर्शनाची ही सुविधा होती. येथून थोड्याच अंतरावर दहाव्या शतकातील शेषशायी विष्णूचे मंदिर आहे. हे मंदिर एकाच कातळातले असून विष्णूची मूर्ती आठ फुटाची आहे.

अट्यनार देवराई नमन समुद्र या गावी आहे. देवराईत जाताना दोन्ही बाजूला टेराकोटाचे घोडे व मधूनच एखादा हत्ती रांगेत ठेवलेले दिसतात. ह्याची आख्यायिका अशी आहे की, अय्यनार ही ग्रामदेवता घोड्यावर बसून सर्वत्र गावाच्या रक्षणासाठी फिरते व पाऊस आणि पाणी याने गाव समृद्धही करते. दर मार्च महिन्यात मोठा उत्सव करून ह्या ग्रामदेवतेचे भक्तगण कृतज्ञता म्हणून घोडा किंवा हत्ती अर्पण करतात.



कोनीलूर मंदिरात अनेक देव देवतांच्या म्हणजे शिव–पार्वती, नंदी, नटराजा ब्रह्मदेव, गणपती ह्यांच्या दगडांच्या कोरीव मूर्ती आहेत. विशेष म्हणजे कार्तिकेय व त्याच्या पत्नी वल्ली व देवयानी यांच्याही मूर्ती पहायला मिळाल्या. पाचशे वर्षे जुने असे हे मंदिर प्रतिरामेश्वरम समजले जाते. या देवस्थानाची व्यवस्था चेट्टीयार समाजाकडून पाहिली जाते.

आम्ही पाहिलेल्या सर्व देवस्थानांचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे प्रवेशद्वारासह इतरत्र असलेले अप्रतिम कोरीव काम केलेले उंचच उंच खांब अतिशय लक्षवेधी.

आता थोडे आम्ही पाहिलेल्या हेरीटेज वास्तुविषयी. विशालम हेरीटेज, अयप्पन ह्यांचे निवासस्थान व अथनगुडी मॅन्शन या प्राचीन वास्तूंना देखील आम्ही भेट दिली. विशालम हेरिटेजची दोन मजली भव्य दिव्य इमारत. उंच कोरीव खांब, छतातील झरोके, प्रशस्त कोर्टयार्ड जेवणघर, वगैरे सर्वच मोहित करणारे होते. आम्हाला अगत्याने दुपारचे जेवण वाढून उत्तम सुग्रास शाकाहारी व मांसाहारी पदार्थांनी तृप्त केले.

येथून जवळच मीनाक्षी मय्यपन ह्यांचा जन्म झालेले त्यांच्या वडिलांचे घर पाहिले. या हेरिटेज वास्तूंमधील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काही खोल्यांच्या दारांच्या वरील भागात असलेली कोरीव गजलक्ष्मी. याची कथा म्हणजे विवाह करून घरी आल्यावर मुलीने आणलेल्या हुंड्याची सर्व सामग्री ह्या खोलीत ठेवतात. जवळच पूजेसाठी छोटी खोली असते. खोलीची उंचीही थोडी कमी म्हणजे नम्रतेने प्रवेश घ्या व कितीही समृद्धी असली तरी विनम्र व्हा असा गजलक्ष्मीचा संदेश असतो.

अथनगुडी मॅन्शन ही वास्तु ९४ वर्षे जुनी आहे. ह्याच्या घडणीत देखील बेल्जियम ग्लास, इटालियन मार्बल्स, जर्मनी–जपानच्या टाईल्स वगैरेचा सुंदर वापर केल्याचे जाणवते. ह्या दोन दिवसांच्या देवस्थाने व हेरीटेज वास्तु पहाण्याच्या प्रवासात आणखीही काही ठिकाणे पाहिली जी कायम स्मरणात राहतील. 'आदन कोटाई' या गावात रस्त्यावर काजूच्या बिया भाजून फोडून त्या काजूच्या पिशव्या विकणारे चारपाच कंपू तसेच विशालम् हेरीटेजपासून थोड्या अंतरावर एका महिलेने इतर सातआठ जणांना हाताशी घेऊन बनवलेले स्नॅक्स व मसाले. हे छोटेसे उद्योग केंद्र. या दोन्ही स्थानांवर भरपूर काजू, मुरुक्कु, रीबन पकोडा व इतर पदार्थांची खरेदी झाली हे वेगळे सांगायला नको.

कोवीळूर देवळाच्या समोरच आम्ही एक प्रशिक्षण केंद्र, गोशाळा व चेट्टीनाड लाईफ स्टाईल संग्रहालय पाहिले. या प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख विश्वस्त एक चेट्टीयारच होते. विशेष म्हणजे त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना रुक्मिणी अरुंदेल यांचे साहाय्यक म्हणून काम केले होते. या प्रशिक्षण केंद्रात ११ ते १५ वयोगटातील मुलांना पारंपरिक संगीत तसेच लाकूड, धातू आणि

पाषाणापासून कोरीव काम करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. तेथील एका शिक्षकाच्या नादस्वरमच्या सुगम वादनाचा आम्हाला अनुभव घेता आला.

तेथील संग्रहालय हे देखील एका चेट्टीयार व्यक्तीच्या देणगीतून संपन्न झालेले आहे. येथे सर्व प्राचीन काळच्या घरगुती वापराच्या विविध वस्तु बघायला मिळतात.

अथनगुडीत असताना आम्ही टाईल्स कारखान्याला भेट दिली. टाईल कारखान्याच्या विविध प्रक्रियेबद्दल माहिती व थोडे प्रात्यक्षिकही बघितले. हँडमेड डिझाईन्ड टाईल्सच्या प्रक्रिया पाहताना खूप मजा आली. या टाईल्स अतिशय जड असल्याने सोवेनीर म्हणून नेता येत नाही म्हणून विषाद वाटला.

आणखी एक विशेष उल्लेखनीय ठिकाण म्हणजे तंजोर आर्ट पेंटिंग्स करणारे श्री. राजा राजन यांचे निवासस्थान. या पेंटींग्समध्ये देव देवता असून सोने व रत्नांचा एम्बोसिंगसाठी वापर केला जातो. भरपूर खरेदी केली हे वेगळे सांगायला नकोच.

स्थल दर्शनात खरेदीचा भाग होताच. शिवाय २० तारखेची संध्याकाळ स्थानिक बाजार खरेदीसाठी राखून ठेवली होती. अँटीक भागांत फार काही आकर्षक सांपडले नाही. पण दुसऱ्या ठिकाणी एका मोठ्या दुकानात साड्या, ड्रेस मटिरीयल खरेदी करता आले. येथील सुप्रसिद्ध 'नरसू' कॉफी पाकिटेही अनेकांनी खरेदी केली.

आता भ्रमंतीनंतर चेट्टीनाड प्रसिद्ध खाद्यपदार्थांचा थोडा आढावा. प्रत्येक दिवशी सकाळचा नाश्ता व दोन्ही वेळचे जेवण आम्हासाठी मोठे आकर्षण होते. जेवणही कधी ताटात तर कधी केळीच्या पानावर. नाश्त्याला ओळखीचे नेहमीचे इडली, दोसा, अप्पे बरोबरच्या चटण्या सांबार वगैरे होतेच, पण ब्लॅक राईस, पुडिंग, पोंगल भात, पुरी भाजी असे थोडे वेगळे पदार्थही खायला मिळाले. शिवाय ऑरेंज ज्यूस, फळे (पपई, कलिंगड वगैरे) आणि विनंतीनुसार बनवलेले उत्कृष्ट आमलेट देखील असायचे. जेवणाचा तर विशेष थाट असायचा. अनेक पदार्थ व ते देखील अतिशय चविष्ट. मसाला ताक व भोपळी मिरचीचे सूप तर कायम लक्षात राहील. उल्लेखनीय मांसाहारी पदार्थ म्हणजे कोलंबी मसाला, कुर्ली मसाला, पेपर चिकन, चिकन बिर्याणी, तळलेले सुरमई, फ्राइड मटन चॉप्स वगैरे आतासुद्धा तोंडाला पाणी सुटते. जेवणाची सांगता करताना पुडींग, आईस्क्रीम, पायसम् वगैरे असायचेच. 'अन्नदाता सुखी भव' असे मनापासून म्हणत आम्ही सर्व जेवण करून निघायचो.

तसेच ह्या प्रवासात अथनगुडीजवळ मिळालेले स्पेश ऑरेंज रंग असलेल्या शहाळ्याचे पाणी व परतीच्या प्रवासात फस्त केलेली लाल सालीची केळी कायम स्मरणात रहातील. भरपूर



भटकंती व पोटपूजा करून जो थोडा मोकळा वेळ मिळत होता त्यावेळी भरपूर गप्पा झाल्या, गाणी म्हटली व हाऊसी देखील खेळलो.

चेट्टीनाड पाहिल्यावर असे वाटले की हे व्यापार धंद्यातील चेट्टीयार लोक कुटुंबवत्सल, संस्कृती जपणारे, दानशूर व श्रीमंती असूनसुद्धा जमिनीवर पाय घट्ट रोवून राहणारे आहेत. चेट्टीनाड भागाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे तेथील हेरीटेज वास्तू, प्राचीन आकर्षक देवस्थाने व विविध खाद्यप्रकार. या सर्वांचा मनसोक्त आनंद लुटून गोड रम्य आठवणींची शिदोरी बरोबर घेऊन २१ तारखेला सकाळी नाश्ता करून जड अंत:करणाने चेट्टीनाडचा निरोप घेऊन मुंबईसाठी परतीचा प्रवास सुरू केला.

**डॉ. वैशाली दडकर**
९७७३०७७३१५

## ☺☺☺ विजूले चुटकुले ☺☺☺

**घोव : नवरात्रीत तुंवे देवीले, साजशृंगार पळयलो. तिका इतले हात आसात पूण एकाही हातात मोबाईल ना.**

**बायल : तुमी विष्णूली मूर्ती पळ्यात. ताका कितले हात आसात पूण एकाही हातात ग्लास ना.**

**मास्तर : 'नंदुरबार' खंय आसा सांग पळय.**

**चलो : सर, माका खबर ना. हाव फाल्या मगेल्या बापायक विचार्न सांगता. ताका सगळे बार्स खबर आसात.**

**चली : काल मगेल्या बापायन तुगेल्या बाईकार बशिल्ले माका पळयले.**

**चलो : मागीर तुगेलो बापूय तुजेर भडकलो उरतलो.**

**चली : ना! ताणे माका टॅक्सी खातेर दिल्ले दुड्डु परत मागून घेतले.**

**बायल : पळयात, उलयता, उलयता लग्नानंतर २५ वर्सा कशी सरली ते कळलेच ना.**

**घोव : पण हांव तर कायच उलयलोना.**

– विजय सदानंद वागळे,ठाणे-९२२१६०७५७७



**श्रीमती स्मिता नाडकर्णी यांचे पाककलेवरील**
**'Smita's GSB Treasure'**
**नावाचे You tube channel**

मुखपत्रिकेच्या गेल्या दोन अंकात श्रीमती स्मिता नाडकर्णी यांच्या पाककृतीचे तपशील दिले होते. त्यांचा हा तिसरा प्रकार त्यांच्याच शब्दांत

**३. मडगणे (गोडशे)**

**साहित्य :** शिजवलेली चणाडाळ २ वाटी, दीड वाटी गूळ, १ चमचा भाजलेले तीळ, पाव वाटी काजू तुकडे, पाव वाटी ओल्या खोबऱ्याच्या कातळ्या, १ चमचा जायफळ पावडर, चवीसाठी मीठ, १ नारळाचा रस (अर्धा जाड रस, अर्धा पातळ रस)

**कृती :** चणाडाळ शिजविताना त्यात काजू तुकडे, खोबऱ्याच्या कातळ्या व तीळ घालावे. डाळ छान मऊ शिजवावी. डाळ शिजल्यावर त्यांत गूळ किसून घालून गूळ विरघळला की त्यात पातळ नारळाचे दूध घालावे. जायफळ पूड घालावी. मीठ घालावे. उकळी आल्यावर त्यात नारळाचे जाड दूध घालावे. एक उकळी आणून गॅस बंद करावा.

वरील कृती प्रत्यक्ष पाहण्यासाठी **'Smita's GSB Treasure'** हे **You tube channel** पहावे.

**–स्मिता अजित नाडकर्णी,** दहिसर – ९३२४३ ८३०२२


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## निसर्गरम्य लोणावळ्यातील सेवाव्रती डॉ. एम्. आर. कामत
## कशासाठी पोटासाठी
## खंडाळ्याच्या घाटासाठी

ही बालपणी वाचलेली कविता आठवते. लोणावळ्यात घालविलेल्या सुखद स्मृती माझ्याभोवती फेर धरतात. मुंबईहून मी इथे आले अन् मी लोणावळेकरीण झाले. थोड्याच कालावधीत आसपासच्या लोकांशी माझी ओळख झाली. माझ्या घरापासून खूप जवळ नगरपालिकेचा दवाखाना अन् सुतिकागृह होते. नंतर थोड्याच कालावधीत माझ्या मिस्टरांची व होन्नावर यांची ओळख झालील. ते होन्नावरचे तर त्यांची पत्नी आशा अंकोल्याची. एके दिवशी मिस्टर होन्नावर एका नव्या व्यक्तीला सोबत घेऊन आले. ही नवीन व्यक्ती म्हणजे डॉ. एम्. आर. कामत होय. ते होन्नावरचे तर माझे मिस्टर व्हंडकल (कुमठ्याचे) मग दोस्तीचे 'त्रिकूट' जमले. डॉ. कामतची सुविद्य पत्नी किशोरी ही शिर्सीचे डॉ. करूर यांची कन्या. पुढे आप्पा देसाई अन् सुधाताई, लता नायर (न्या. पालेकर मामा) असे आमचे 'पंचकूट' जमले.

आज मी लिहीणार आहे ते डॉ. कामतबद्दल. ते माझे दादा अन् माझ्या मुलांचे 'मामा' झाले. जवळ जवळ पाच तपे आमच्या 'ऋणानुबंधाची' तार आजही जोडलेली आहे. आज ते हयात नाहीत. परंतु त्यांचा मुलगा डॉ. अभय अन् सून डॉ. नेहा त्यांचा वारसा चालवीत आहेत. कन्या सौ. वंदना रेगे मुंबईला असते तर चि. अमित यू.एस.ए.ला इंजिनियर आहे.

लोणावळ्यात १९५७ ला लोकसंख्या खूप कमी अन् सुखसुविधांची साधने नव्हतीच. दवाखाना छोटा असला तरी डॉक्टर अन् परिचारिका, नोकरवर्ग यांची सोय होती. माझी कन्या ॲड. मृदुला दिवसभर तिथेच रमायची. त्यांनी समोर सुंदर बाग केली होती.

डॉक्टर कामतना सगळेजण खूप मान देत. हिवाळा असो किंवा पावसाळा असो त्यांनी दिवसरात्र रुग्णांची अविरत सेवा केली. रात्री अपरात्री ते कधी पायी तर कधी बैलगाडीतून व्हिजीटला जायचे. गावात एक टांगा अन् एक टॅक्सी होती. कितीही गैरसोय झाली तरी त्यांनी रोग्याच्या बाबतीत हयगय केली नाही. लोक त्यांना 'रुग्णांचे भगवान' मानायचे.

डॉक्टर कामत आणि लोणावळा या दोघांमध्ये एक आगळे नाते होते. लोणावळ्याच्या पंचक्रोशीत त्यांना न ओळखणारा कोणी सापडणे विरळा! सेवानिवृत्त होईपर्यंत मनापासून त्यांनी केलेल्या अनेक उपायांमुळे अनेक रूग्ण आपल्या जीवघेण्या व्याधीपासून मुक्त झाले. त्यांनी सर्वस्वी संपूर्णपणे एक–एक क्षण व्याधीग्रस्तांसाठी समर्पिला आहे.

त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हॉटेल चंद्रलोक इथे लायन्स क्लबतर्फे एक समारंभ आयोजित केला होता. 'लायन्स एक्सलन्स' ॲवार्ड देऊन त्यांना गौरविण्यात आले. अविरत सातत्याने केलेल्या सेवेमुळे त्यांनी मोठा जनसंग्रह केला होता. त्यांना अनेक भाषा अवगत असल्यामुळे रुग्णांशी जवळीक साधता येत असे. कर्जत ते तळेगावपासून रोगी येत असत. साधी

रहाणी अन् उच्च विचारसरणी, त्याच्या जोडीला निगर्वीपणा अन् विनोदबुद्धी हे विशेष गुण त्यांच्या ठिकाणी होते. अशा वेळी ते रात्री–बेरात्री रोग्याच्या हाकेला धावून जात असत. नगरपालिका अन् राजकारणी लोकांपासून ते नेहमीच अलिप्त राहिले. तसेच ‘प्रसिद्धी’ झोताच्या माध्यमापासून ते फार दूर राहिले.

त्यांचा आवडता छंद म्हणजे बागकाम. फुरसतीच्या क्षणी ते बागेत रमत असत. उत्कृष्ट लेखकांची पुस्तके वाचणे हा त्यांचा दुसरा छंद होता. त्यांचा मित्रपरिवारही छान होता. घरातील सर्व व्यवहाराकडे अन् आपल्या मुलांकडे त्यांचे लक्ष होते. त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षणी त्यांची सुविद्य अन् सुगरण पत्नी किशोरी यांची साथ होती.

त्यांच्या निधनामुळे त्याकाळी अनेक रोग्यांची हानी झाली होती. असा हा माझा सेवाव्रती भाऊ याच्या पवित्र स्मृतीस ही शब्दांची ओंजळ अर्पित करते.

**– कुंदा र. देसाई –** ९८१९०५२३१९


**A name that spells its class !**

# WINOVER

## CATERERS

**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS**
**Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
***ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR***

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**


**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road,**
**Vile Parle East, Mumbai - 400 057**





www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के**

प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था

a Project by:
KCC कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

**मुंबई ऑफिसः** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:**2683 3841/47/ 72.** मोबाः **98336 36451**
फॅक्सः 2683 3872 ई-मेल kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321
गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

kunalconstructiongoa@yahoo.in **GOA RERA NO: PRGO05180314**

# My Mother
# Mrs. Prema Gopalkrishna Divekar
# A Tribute

14 Oct 2022 marked the 100 years of birth of my dear mother

**Mrs. Prema Gopalkrishna Divekar.**

Born to Mr Anandrao Nerurkar and Mrs Kamalatai Nerurkar, she was the second child of the five brothers and sisters. Hers was a modern affluent family. My maternal grandfather retired as Income Tax Deputy Commissioner, a top position for an Indian in British days. He constructed a three storied building in Matunga in the early 1900s. Yet, all this richness did not impact my mother who was an epitome of virtue, was simple, down to earth, compassionate, loving and caring. She was the favourite Mami to my cousins and every summer we used to have hordes of relatives visiting us mainly because of her excellent hospitality and nature. To her, family was everything and she seconded her interest for the sake of her children, husband and later grandchildren too.

Immediately after marriage in 1945, she set up home with my father who was posted to Castle Rock, a God forsaken place in the jungles bordering Karnataka and Portugese Goa. From a city bred to living in a jungle with snakes, scorpions, wild bisons, bears and leopards, with no running water, cooking using firewood and living under a roof that leaked during rains and from where insects and lizards dropped, never bothered her and she took it in her stride and did it cheerfully. She packed, moved and set up house every time my father was posted to a new place be it Shimla, Jaysinghpur, Baroda, Cheenai, Bellary, Baroda.



She had a zest for life and lived life to the fullest. Even though the places where my father was posted were small, she used to gather the families and set up cultural groups who used to have competitions for children, play sports and games, conduct plays and drama. She played ball badminton and won many prizes at Bellary, Baroda, Chennai, took part in plays in the role of a man (albeit with a moustache, cap and trousers). In Bellary, in 1966, we bought a Fiat car. For Bellary which was a sleepy town then, a car was a novelty. My mother, on my father's insistence, learnt to drive a car and she used to drive us to the market. It was a sight to see the expression on the face of people when they saw a lady driving.

Her ability to drive a car helped us many times. Once, as a family, we all were travelling from Bellary to Puthaparthi to take darshan of Shri Satya Sai Baba. The road was a dirt track, and at one place we had to drive through a ford of a river which was a good 50 to 60 meters wide and has about a foot of flowing water and the river bed was mostly sandy. My father had driven barely 10 meters when the car got stuck in the sand and refused to move forward. The wheels kept slipping and moving in the same place. We were totally stuck. It was around 6 pm and getting dark. Other than my father, the other males were my brother and me (just 8 years old). We had four ladies: my grandmother, my mother and my two elder sisters. We tried to push the car but it just would not move. We panicked and did not know what to do as on that road there was no traffic at all and no places or villages nearby. Suddenly, we saw a few villagers come out from the sides on the opposite bank. We requested their help. Seeing that it was getting dark and there were so many ladies with just two young boys not even in their teens, they asked for a lot of money. Pleading and bargaining did not help because they knew we were stuck. That is the time, my father and I cleared the sand from

under the four wheels, made a long furrow in front of each wheel and put stones under the wheels and in the furrows. My mother sat in the drivers' seat and my dad, brother, sisters and I pushed the car. Getting grip on the stones the car leapt forward and in one motion, my mother drove the car through the river bed and on to the other side. We all leapt in joy. The villagers couldnot believe their eyes. They never thought that a lady could drive a car and so well. She saved us that day.

Every Diwali my mother used to make Diwali sweets. She did so even till her late 70s. The making would start one month in advance. She would make over 30 type of Diwali sweets, laddus (4 types), karanji, anarsa, colouredchirota, sankarpali, chivda (3 types), shev, kadboli, chakli etc and in huge quantities. She used to make them mainly for me as I was in a boarding school in Belgaum. My parents used to come and give me the sweets. I used to hide them from my hostel mates and eat them every day relishing them.

She was a voracious reader, and her favourite books were of Perry Mason. She also used to read Marathi and English magazines. She loved to travel and went on many trips with Kesari Travels to various religious and other places in India. She instilled sense of adventure, zest for life and culture in us, and would ensure that I visit all relatives in Mumbai when I came on leave from school or later while serving in the Army. That helped keep the connect with my relatives.

Today, as I look back, I realise the huge impact she had on my life. She was my first teacher who taught me many things and kept teaching me in her own way even in my later years. She was humble, loving and always cheerful. She had a good sense of humour, and was a favourite for her jokes amongst relatives.



She lived a full life. Been there, seen that, done this. She left an indelible mark on me. Her legacy carries on through us her children. Even though she is not with us in person, she lives in our hearts and memories. We miss her.

**Brig. Rajiv G . Divekar,** Pune

97652 90159

MSIPL MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Invest Rs.1000/- Per month & get...

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given avearge 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## कारवार येथील लोकप्रिय कलासक्त छायाचित्रकार
## सौ. संध्या कामत रायकर हिचे अकाली निधन

टवटवीत, सुगंधित, हसऱ्या फुलाला बघून अकस्मात एका विषारी किड्याने दंश करावा आणि त्या निष्पाप फुलाने मान टाकावी असंच काहीसं आमच्या संध्याच्या बाबत घडलं. सदैव उदंड ऊर्मी, उमेद, उत्साह यांनी रसरसलेलं तिचं व्यक्तिमत्व देवालाही प्रिय झालं असावं.

कारवार येथील गव्हर्मेंट हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक व कोंकणी कवी कै. शांताराम कामत यांची धाकटी नात व कै. प्रा. माधव कामत व किशोरी तेलंग कामत यांची कनिष्ठ कन्या म्हणजे संध्या. संध्याचे आजोबा कै. विश्वनाथ तेलंग व माझे वडील कै. शंकर तेलंग हे चुलत भाऊ. ते दोघे एकाच वास्तूत शेजारी रहायचे व मार्केटमध्ये औषधाचे दुकान चालवायचे. संध्या माझ्या आई वडिलांना काकी काकाच म्हणून संबोधित असे. आमची लाडकी भाची संध्या संजय कामत रायकर या जगातून वयाच्या अवघ्या ५५ व्या वर्षी सर्वांनाच जबर चटका लावून गेली. सौंदर्यवती, कलावती, सुगृहिणी, पाककलाशिक्षण, पाहुणचार लोलुप, आदरातिथ्य प्रिय, मृदुभाषी आणि रसिक अशी ही संध्या. फोटोग्राफी हे तिचं पॅशन होतं. तिच्या यजमानांना व्यवसायानिमित्त बाहेर जावं लागलं तेव्हा त्यांचा मूळचा रायकर फोटो स्टुडिओ बंद करण्याऐवजी स्वत:च्या हिंमतीवर तो चालविण्याची हमी घेऊन तो विकण्यापासून परावृत्त केले आणि तो पूर्वार्जित व्यवसाय तिने समर्थपणे पेलून आपली कार्यक्षमता सिद्ध करून दाखविली. विशेष म्हणजे तिच्या नवीन फोटो स्टुडिओचे उद्‌घाटन कोणा बड्या नामांकित व्यक्तीच्या हस्ते न करविता प्रेमादरापोटी काका काकींच्या हस्ते केले.

मैत्री जुळविण्यात तिला कुणाच्याही वयाचं अंतर आडवं येत नसे. उदाहरणच द्यायचं तर माझी ८० वर्षांची आई (संध्याची चुलत आजी) आणि त्यावेळी २५ वर्षांची संध्या यांचे आजी-नात हे नातं मैत्रिणींत बदललं होतं. आजोळी आली की तिची पावले सख्ख्या आजीकडे वळण्याआधी काकीच्या बाजूला वळत. मन हलकं करावं तर काकीकडे.



घरात बनविलेले कुठलेही खाद्यपदार्थ असो त्यातला एक वाटा काका-काकींसाठी राखीव असे. मी कारवारला गेले की माझ्या मुलींना आपल्या घरी नेऊन फॅशनेबल ड्रेसीस घालून त्यांचं कौतुकाने फोटोसेशनही ती करायची. आम्हां मामा मावश्यांच्या अंगा खांद्यावर खेळलेल्या या हरहुन्नरी संध्याची जीवनसंध्या अकालीच व्हावी ही कठोर ईश्वरेच्छा स्वीकारणे आता क्रमप्राप्त आहे.

**– मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर**

**९४२०२४२३९६**

### निधन

| | | |
|---|---|---|
| उमाबाई काशिनाथ कसबेकर | (खारगे) | खारगे |
| सुहासिनी गजानन मिटबंदर | (अंकोला) | ठाणे |
| माधव मंगेश मुझुमदार | (अंकोला) | बोरीवली |
| माधव (बबन) गजानन मुझमदार | (अंकोला) | मालाड |
| नलीनी (कृष्णाबाय) विनायक मुझुमदार | (अंकोला) | जोगेश्वरी |
| संजीवनी मारुति मुझुमदार | (अंकोला) | वाशी |
| लक्ष्मीकांत (प्रशांत) सदानंद नाडकर्णी | (मल्लापूर) | पुणे |
| स्तिमीता जगदीश नायक (पूर्वाश्रमीच्या मंगला गणपती कुलकर्णी) | (हळगे) | बदलापूर |
| सुमती संभाजी पालव (पूर्वाश्रमीच्या सुमती दिनकर कुलकर्णी) | (हळगे) | पुणे |
| जयश्री शशिकांत फेणे | (चेंडिये) | वाशी |
| संध्या संजय रायकर (पूर्वाश्रमीच्या संध्या माधव कामत) | (कारवार) | कारवार |
| गुरुदास मंगेश राजाध्यक्ष | (कारवार) | माहीम |
| महारुद्र माधव तेलंग | (बाड) | पारले |
| मीना अजित वागळे | (माजाळी) | जोगेश्वरी |

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या
## (मागील अंकानंतर)
## उल्लेखनीय देणग्या

### श्री अरविंद नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ
### तीन लाख रुपयांची देणगी

मागच्या पिढीत सर्वसामान्यांप्रमाणे नोकरी न करता स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या अति मोजक्या मंडळींपैकी एक म्हणजे स्व. लजपत दत्तात्रय (दत्तु वकील) नाडकर्णी. त्यांची कोडीबाग येथे तांदळाची गिरणी व सॉ मिल होते. त्यांना नाटकात काम करण्याचीही हौस होती. पु.लं.नी सुद्धा आपल्या 'बालपणीचा काळ सुखाचा' या जोगेश्वरी येथील सरस्वती बागेच्या संदर्भात एका लेखात लजपत यानी 'पुण्यप्रभाव' नाटकात काम केल्याचा उल्लेख केला आहे. त्यांचे चिरंजीव श्री. अरविंद नाडकर्णी हे १९५७ साली हिंदु हाय स्कूलमधून एस.एस.सी.च्या परीक्षेत बोर्डातून गुणवत्ता यादीत चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. त्यांचे अलीकडेच पनवेल येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ त्यांचे सुविद्य सुपुत्र श्री. शिरीष नाडकर्णी यांनी तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील दीड लाख वैद्यकीय साहाय्यासाठी आहेत व उर्वरित दीड लाख वृद्धसेवा निधीसाठी आहेत.

### श्री. अनिल नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी
### ७५ हजार रुपयांची देणगी

गोरेगांव येथे राहणारे श्री. अनिल काशिनाथ नाडकर्णी यांची अलीकडेच ७५ वर्षे पूर्ण झाली. त्या औचित्याने त्यांच्या पत्नी श्रीमती वीणा यांनी ७५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील ४५ हजार रुपये वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहेत व उर्वरित ३० हजार रुपये समाज सेवेसाठी आहेत.

### डॉ. प्रज्ञा व डॉ. सतीश गायतोंडे यांच्यातर्फे वृद्ध सेवा निधीसाठी
### पन्नास हजार रुपयांची देणगी

वडाळा येथे राहणारे डॉ. प्रज्ञा व डॉ. सतीश गणपती गायतोंडे यांनी उभयतांच्या आईंच्या स्मरणार्थ म्हणजे अनुक्रमे श्रीमती उषा उमेश नाडकर्णी व डॉ. सरोजिनी गणपती गायतोंडे यांच्या स्मरणार्थ वृद्ध सेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.



### डॉ. नरेंद्र यार्दी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला आणखी
### पन्नास हजार रुपयांची देणगी

मागे २०१९ साली तीन उच्च विद्याविभूषित यार्दी बंधूंनी एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी दिली होती त्याचा तपशील जानेवारी २० च्या मुखपत्रिकेत दिला होता. त्या तीन बंधूपैकी एक डॉ. नरेंद्र यार्दी हे आय.आय.टी., पवईचे डॉक्टरेट आहेत व बडोदा येथे त्यांचा व्यवसाय आहे. त्यांनी नंतर २०२० साली एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपये दिले. अलीकडेच त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | |
|---|---|
| १. यमुनाताई, सपाताई व सिंधुताई बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजेनिमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून | ३००३ |
| २. श्री. पराग गजानन वागळे यांजकडून | १००१ |
| ३. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित रमाकांत बोरकर यांजकडून | १००१ |
| ४. श्री. अनिल काशिनाथ नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रसंगी पत्नी श्रीमती वीणा यांजकडून | ३०००० |
| ५. श्रीमती ज्योती अभय वर्टी यांजकडून | १०००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | |
|---|---|
| १. श्री अरविंद सजपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शिरीष नाडकर्णी यांजकडून | १५०००० |
| २. श्री. श्रीपाद लक्ष्मण पिकळे यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती लता यांजकडून | १०००० |
| ३. श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या जयंती प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. पराग यांजकडून | २५००० |
| ४. श्री. अनिल काशिनाथ नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रसंगी पत्नी श्रीमती वीणा यांजकडून | ४५००० |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | |
|---|---|
| १. श्री. प्रभाकर दुर्गादास स्थळेकर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती ज्योती करूर यांजकडून | १००१ |

२. श्री. अरविंद लजपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र
श्री. शिरीष नाडकर्णी यांजकडून १५००००
३. श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या स्मरणार्थ
कन्या श्रीमती रेखा मिलिंद तेलंग व मीनल सतीश भुजले यांजकडून ५०००१
४. श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या
पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलिंद व निमीष यांजकडून ५००१
५. श्रीमती उषा उमेश नाडकर्णी व डॉ. सरोजिनी गणपती गायतोंडे
यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे कन्या डॉ. प्रज्ञा व पुत्र डॉ. सतीश गायतोंडे यांजकडून ५००००
६. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र श्री. अजित रमाकांत बोरकर यांजकडून १००१
७. श्री. श्रीपाद लक्ष्मण पिकळे यांच्या दुसऱ्या
पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती लता यांजकडून १००००
८. श्रीमती अनसूया अनिल मजली यांजकडून ११०००
९. श्रीमती निर्मला अरुणकुमार परुळकर यांच्या पहिल्या
पुण्यतिथीप्रसंगी कन्या श्रीमती अश्विनी व जामात
व्यंकटेश यशवंत कुलकर्णी यांजकडून ५००१
१०. श्री. उमेश शंकर बोरकर यांजकडून बंधु उदय व
पुतण्या आदित्य यांच्या स्मरणार्थ १००००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्रीमती सावित्री नागेश पालेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त
पुत्र श्री. प्रकाश यांजकडून २५०१
२. डॉ. नरेंद्र यार्दी यांजकडून ५००००
३. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २६ व्या
पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून १००१
४. श्री. श्रीपाद लक्ष्मण पिकळे यांच्या दुसऱ्या
पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती लता यांजकडून १००००
५. श्रीमती प्रेमा गोपाळकृष्ण दिवेकर यांच्या
जन्मशताब्दीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र
ब्रिगेडीयर डॉ. राजीव यांजकडून २५०००



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

Multiple Rewardz
in One Fixed Deposit



w.e.f. 19.04.2021

| | From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|---|
| General Public | 5.60% p.a. | 5.75% p.a. | 5.85% p.a. |
| Senior Citizen | 5.85% p.a. | 6.00% p.a. | 6.35% p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com
Call us: 022 28602000

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.